# चेहरे

**गा**वच्या आयाबायांबरोबर, अण्णा-तात्यांबरोबर कुदळ फावडी घेऊन मातीत राबणारा, दुष्काळाशी लढण्या-झगडण्यासाठी घाम गाळणारा, शेता-शिवारातल्या, उन्हातान्हांतल्या कामात आपलं 'सुपरस्टार'पण सहज बाजूला काढून ठेऊ शकणारा आमीर खान...

'मोक्षा'च्या शोधातला आपला प्रवास थेट 'मार्केट' काबीज करण्यापर्यंत नेऊन धडाक्याने पोचवणारे, अस्सल देशी मातीतला 'कॉर्पोरेट हिसका' दाखवून बड्या-बलाढ्य कंपन्यांच्या तोंडचे पाणी पळवणारे दोन संन्यासी... बाबा रामंदेव आणि आचार्य बालकृष्ण!

प्रति किलोमीटर बारा रुपये इतक्या अत्यल्प 'ॲव्हरेज'मध्ये नव्या भारताची सशक्त महत्त्वकांक्षा पृथ्वीवरुन थेट मंगळावर नेऊन पोचवणारी 'इसरो' सारखी जागतिक दर्जाची संस्था...

स्वत:च्या पत्नीची अवघडली अवस्था ओळखून तिच्यासारख्या सामान्य स्त्रियांची अडचण सोडवण्यासाठी मानेवर भूत बसल्यासारख्या वेडाने धडपडलेला, 'सॅनिटरी नॅपकीन वापरणारा पुरुष' म्हणून जगाने गौरवलेला एक अवलिया... अरुणाचलम मुरुगनाथम!

खेड्यापाड्यांतल्या कानाकोपऱ्यांत कधीच्या दुर्लक्षित पडलेल्या 'झेड.पी.'च्या पडक्या शाळांना नवे हसते-बोलते डिजिटल रुपडे देऊन चौथी-पाचवीतल्या ग्रामीण मुलांच्या हाती नव्या जमान्याची साधने देण्यासाठी धडपडणारे, त्यासाठी पदरमोड करणारे शिक्षक...

आपापल्या वाट्याच्या शेताच्या छोट्या तुकड्यात सोलर पॅनल लावून आपल्यापुरेशी वीज पिकवणारे, जास्तीची वीज सरकारला विकून अधिकची कमाई करणारे गुजरातमधले शेतकरी...



- आणि 'इट्स ओके, नॉट टू बी ओके' असे स्वच्छ सांगून ग्लॅमरच्या झगमगाटातही स्वत:ची 'ओळख' हट्टाने राखणारी एक तरुण अभिनेत्री... आलिया भट!

... काय आहे, कोण आहेत हे सगळे???

मला वाटते, नव्या भारताचे अनेक चेहरे!!!

व्यक्तिगत असो की सामुहिक, आपापल्या आयुष्यांना घेरुन असलेले प्रश्न सोडवण्यासाठी प्रश्नांच्या मुळाशी जाणारे, तिथून नवा रस्ता शोधणारे आणि त्यावरुन उत्तरांच्या दिशेने जाणारे हे प्रयत्न फार मोलाचे आहेत.

वर्षानुवर्षे आपले प्रश्न सोडवण्या-साठी प्रगत जगाने शोधलेल्या उत्तरांकडे डोळे लावून बसण्याची भारतीय मनोवृत्ती किती विविध स्तरांवर वेगाने बदलते आहे, याची अत्यंत सुखद प्रचिती यावर्षीच्या 'दीपोत्सव'साठी माझ्या सहकाऱ्यांनी कष्टपूर्वक शोधून आणली आहे.

देशाच्या कानाकोपऱ्यांत आपापल्या कामात मग्न असलेली अशी विलक्षण माणसे, असे समकालीन अनुभव हे सारे संचित घेऊन दिवाळीच्या मंगलपर्वाच्या आधी मराठी घराघरांत पोचण्याचा 'दीपोत्सव'चा वसा याहीवर्षी आम्ही मनोभावे निभावतो आहोत, याचा आनंद वाटतो.

यावर्षीच्या मुखपृष्ठावरल्या गोष्टी म्हणजे जुन्या माळ्यावरुन शोधून आणलेल्या आपल्या पूर्वजांच्या आठवणीच! आपल्या मुळांकडे नेणारे हे स्मरणरंजन, त्याला आम्ही नव्या झगमगत्या वर्तमान दीपोत्सवाची झालर लावतो आहोत!

'मराठी माणसे मराठीत वाचत नाहीत, कारण त्यांना 'जे हवे' ते आणि तसे मराठीत काही नसते' या नन्नाच्या उदास पाढ्याला कधीतरी पूर्णविराम द्यावा, या हेतूने सुरु झालेला 'दीपोत्सव'चा प्रवास यावर्षी अडीच लाख प्रतींच्या विक्रीचा उच्चांक गाठतो आहे.

आणि आता 'दीपोत्सव' केवळ भारताच्या सीमांपुरताच मर्यादित नाही. जगभरात 'जिथे मराठी, तिथे लोकमत' पोचवण्याच्या स्वप्नाचे बीज मी माझ्या सहकाऱ्यांमध्ये दीर्घकाळापासून रुजवतो आहे. भौगोलिक सीमा ओलांडून 'लोकमत'ला सातासमुद्रापार नेणाऱ्या आमच्या प्रयत्नांमध्ये 'दीपोत्सव' अर्थातच अग्रभागी आहे! हा अंक आता मुद्रित स्वरुपात तर वाचता येईलच, पण संगणक, मोबाईल, टॅब, ईबुक रीडर अशा आपल्या आयुष्यातल्या प्रत्येक 'स्क्रीन'वर तो असेल!

मराठी प्रकाशन विश्वात 'दीपोत्सव'ने दरवर्षी रचलेले नवे विक्रम तुम्हा वाचकांच्या प्रतिसादामुळेच आम्ही पूर्णत्वाला नेऊ शकलो, याची कृतज्ञतेने नोंद करतो. यावर्षी तर प्रसिध्दीपूर्व नोंदणीचे आकडेच 'दीपोत्सव' हा अंक नसून खरेच उत्सव ठरला आहे, याची सुखद प्रचिती देणारे आहेत.

रुपरंगाने आणि अंतरंगाने संपन्न अशी 'दीपोत्सव'ची ही मैफील तुमच्या घरी येईल, तेव्हा आनंदाने, सुखसमृध्दीनेही तुमच्या घराचा उंबरठा ओलांडावा, अशी मन:पूर्वक प्रार्थना... या अंकाच्या पानांमधून यावर्षी देवी लक्ष्मी, श्रीगणेश आणि देवी सरस्वतीची प्रतिमाही घरोघरी येते आहे. शुभंकर, समृध्दी आणि प्रज्ञेचे प्रतिक असलेल्या या देवत्वाचा अंश दिवाळीनंतरही तुमच्या घरा-मनात अखंड राहू दे...

अंगणातल्या रांगोळीच्या गालिचांमध्ये रंग उमलतील, पणत्यांमध्ये दिवे उजळतील; त्या रंगांचा आणि तेजाचा स्पर्श आपल्या सर्वांच्या आयुष्याला होऊ दे... आणि सुखाचं भरलं माप भरुन वाहू दे...

शुभ दीपावली!

विजय दर्डा